# स्त्री सबलीकरणमध्ये फुले दांपत्याचे योगदान

प्रा. श्रीकांत विक्रांत सिरसाठे[1] , प्रा. डॉ. विजय विष्णू पाडळकर[2]
[1]इतिहास विभाग प्रमुख, श्री.स.ह.केळकर महाविद्यालय देवगड जि. सिंधुदुर्ग.
[2]इतिहास विभाग प्रमुख , डी.पी.भोसले महाविद्यालय,कोरेगाव.



## प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्र म्हटला की फुले शाहू आंबेडकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते प्रस्थापित व्यवस्थेला हादरे देऊन नवीन समाजव्यवस्था निर्माण करण्याचे काम या महापुरुषांनी केले एकोणिसाव्या शतकामध्ये जी सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळ भारतात घडून आले त्यामध्ये मोलाचे योगदान ज्या महापुरुषांनी दिले त्यापैकी फुले दांपत्य होय.

एकोणिसाव्या शतकातील समाजामध्ये अनेक वाईट चालीरिती रुढी प्रथा परंपरा होत्या स्त्रियांचे हजारो वर्षापासून शोषण केले जात होते जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उधारी असा मंत्र घोषित करताना पाळण्याची दोरी धरणारे मातेचे हात समाज व्यवस्थेने विकलांग केले आमच्या सामाजिक जीवनाचा एक विरोधाभास आहे स्त्रीचे महात्मे सांगून स्त्रीलाच गुलाम करण्याचे पातक आमच्या हातून गेली तीन हजार वर्षे घडत होते. स्त्रियांच्या गुलामीला वाचा फोडून त्याना बंधमुक्त करण्याचे महान कार्य सावित्रीबाई आणि महात्मा ज्योतिबा या क्रांतिकारी जोडप्याने केले आज एकविसाव्या शतकात स्त्री पुरुषाच्या बरोबरीने खांद्याला खांदा देऊन विविध क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी करत असल्याचे दिसून येते. अबला स्त्रीला सबला बनविण्यात फुले दांपत्याचे योगदान मोलाचे ठरते म्हणूनच प्रस्तुत शोधनिबंधांत त्यांच्या योगदानाचा अभ्यासपूर्ण परामर्श घेण्यात आला आहे.

## उद्दिष्टे:

1. एकोणिसाव्या शतकातील सामाजिक सुधारणा चळवळीचा अभ्यास करणे
2. फुले कालीन स्त्री जीवनाचा अभ्यास करणे
3. फुले दांपत्यांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
4. स्त्री सबलीकरणामध्ये फुले दांपत्याच्या योगदानाचे महत्त्व प्रतिपादित करणे
5. फुले दाम्पत्याने सुरू केलेले स्त्री सबलीकरणातुन पुढे आलेल्या स्त्रियांचे माहिती घेणे

## संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंध हा दुय्यम साधनसामग्रीवर आधारित असून यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ, मासिके इत्यादी चा आधार घेतला आहे

## मनुस्मृतीतील वचनांना विरोध:

प्राचीन काळात मनुस्मृतीची निर्मिती करण्यात येऊन स्त्रियांना आणि आणि शूद्रांना हजारो वर्ष गुलामीच्या खाईत लोटण्याचे काम मनुस्मृति तील वाचनानी केले. पुरुष प्रधान संस्कृती निर्माण करण्यासाठी मनुस्मृतीची निर्मिती करण्यात आली. स्त्रीला अबला ठरवण्यात आले नेहमी ती पुरुषाच्या छत्रछायेखाली राहिली पाहिजे म्हणून मनूने मनुस्मृतीमध्ये 'स्त्री स्वातंत्र्य न अर्हती' असे वचन निर्माण केले त्याच्या समर्थनात मनु म्हणतो की,

' पिता रक्षति कौमार्य! भरता रक्षति यौवने
पुत्रस्तु स्थविरे भावे,न स्त्री स्वातंत्र्यम अर्हती!!

असे मनात म्हणून हजारो वर्ष स्त्रियांना गुलामीच्या खाईत लोटून दिले. त्याचबरोबर मनुस्मृति सारख्या संस्कृत ग्रंथांमध्ये देखील स्त्रियांना आणि शूद्रांना गुलाम बनविण्यासाठी अनेक वचनांची निर्मिती करण्यात आली,

ढोर गवार शुद्र पशु नारी
ये सब ताडन के अधिकारी !

या वचनानुसार स्त्रियांना बडवलं पाहिजे असे असभ्या उद्गार काढण्यात आले एकंदरीतच तत्कालीन धर्मग्रंथानी स्त्रियांना हीनदीन बनविण्याचे काम केले होते, स्त्री दास्यत्वाच्या समर्थनात धर्मग्रंथातून लिखाण करण्यात येऊन स्त्रीच्या जीवनात अंधकार निर्माण करण्याचे काम तत्कालीन व्यवस्थेने केले होते अशा या ग्रंथातील वचनांना कडाडून विरोध करून स्त्री सबलीकरणासाठी प्रयत्न फुले दाम्पत्याने केले. मनुस्मृती व तत्सम ग्रंथामुळे समाजात हजारो वर्ष विषमता प्रस्थापित होऊन समस्त स्त्री जातीचे शोषण केले जात होते त्यामुळे अशी मनुस्मृती जाळून टाकली पाहिजे असे परखड मत ज्योतिबा फुले यांनी त्या काळात मांडले पुढे कालांतराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाहीर रित्या मनुस्मृतीचे दहन करून ज्योतिबा फुले यांची अपेक्षा पूर्ण केली.

## स्त्रियांच्या प्रश्नांवर केलेले उपाय :

एकोणिसाव्या शतकात सर्व स्त्रिया आणि शूद्र, अतिशूद्र हे यातनामय जीवन जगत होते एवढेच नव्हे तर स्त्रियांचे म्हणून काही स्वतंत्र प्रश्न होते बालविवाह सतीप्रथा विधवा पुनर्विवाहाला बंदी विधवांचे केशवपन अशा अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागत होते बालविवाहाची प्रथा आणि विधवांच्या पुनर्विवाहास बंदी यामुळे अल्पवयात विधवा झालेल्या मुलींना भयंकर उपेक्षित जीवन जगावे लागत होते आपल्या विधवा तरुण लेकी सुनांना बंदिवासात टाकून पुरुष अनेक विवाह करून मनमानी करत अनेक बायका करणे हे प्रतिष्ठेचे मानले जात. विधवांमध्ये कामवासणा जागृत होऊ नये त्यांची वाकडे पाऊल पडू

नये म्हणून त्यांना निकृष्ट दर्जाचा आहार दिला जात असे, त्यांची उपासमार केली जात असे, तसेच तिचे केशवपन करून अधिक कुरूप बनविण्यात येत असे. बाल विधवांचे केशवपन थांबवावे यासाठी म्हणून महात्मा फुले यांनी पुण्यामध्ये नाव्ह्यांचा संप घडवून आणला. पुरुषाला जसा पत्नी मेल्यानंतर दुसरे लग्न करण्याचा अधिकार आहे तसाच अधिकार स्त्रियांना देखील असला पाहिजे या भावनेतूनच फुले दांपत्यांनी शेणवी जातीतील एका विधवेचा विवाह लावून देण्यात आला.

विधवांच्या वरती व्यवस्थेने एवढे बंधने घातली असली तरी तारुण्याचा उन्माद त्यांना व्यभिचार करण्यास कधी कधी भाग पाडे यातून गर्भधारणा झाली तर एखादा आठ किंवा विहीर जवळ करून आपले जीवन संपवले याशिवाय दुसरा मार्ग त्यांच्यासमोर होता हा प्रश्न सोडविण्यासाठी म्हणून फुले दांपत्यांनी 1863 साली स्वतःच्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करण्यात आली. कोणा विधवेचे अज्ञान पणाने वाकडे पाऊल पडले तर तिने आपल्या घरात गुप्तपणे बाळंत होऊन जावे अशा आशयाची भित्तीपत्रके पुण्याच्या रस्त्यारस्त्यावर चिटकवण्यात आली,' विधवा नो इथे येऊन गुप्तपणे आणि सुरक्षितपणे बाळंत व्हा तुम्ही आपले मूल न्यावे अथवा येथे ठेवावे हे तुमच्या खुशीवर अवलंबून राहील त्या मुलांची काळजी हा अनाथ आश्रम घेईल'. असा भित्तीपत्रकावर मजकूर होता. विधवांचे व त्यांच्या अनौरस बालकाचे प्राण वाचवणे, विधवा स्त्रियांची मायेने, ममतेने बाळंतपणे करून सावित्रीबाई फुलेंनी एक अभूतपूर्व आदर्श घालून दिलेला दिसून येतो. त्याचबरोबर बहुपत्नीकत्व याला विरोध करत असताना ज्योतिराव फुले असे म्हणतात की,' घरामध्ये महापतिव्रता स्त्री असता अत्यंत लोभी पुरुष तिच्या उरावर लग्नाच्या दोन दोन तीन तीन बायका करता पण बायका आपल्या पतीचा 'सवता' करून नांदत नाहीत'

## सती प्रथेच्या विरोधातून सबलीकरण:

एकोणिसाव्या शतकामध्ये महाराष्ट्रात ज्या अनिष्ट चालीरिती रुढी प्रथा परंपरा होत्या त्यामध्ये मानवतेला काळीमा फासणारी प्रथा म्हणजे सती प्रथा! भारतात बंगाल अनेक भागात सतीप्रथा मोठ्या प्रमाणात अस्तित्वात होते त्याविरुद्ध बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सतीप्रथा बंदी चळवळ सुरू केली या चळवळीला ज्योतिबा फुले ने हिरीरीने पाठिंबा दिला आणि त्याला कडाडून विरोध केला. एकदा एका ठिकाणी वादविवादात सती प्रथेच्या समर्थनार्थ असणाऱ्यांना ज्योतिबा फुले यांनी ठणकावले पती भक्ती शिद्ध करण्यासाठी मेलेल्या पतीच्या चितेवर पत्नीने आत्मदहन करावे असे तुम्ही म्हणता तर मला असे एखादे उदाहरण दाखवा की पत्नी मेल्यानंतर आपले एकनिष्ठ प्रेम सिद्ध करण्यासाठी पत्नीच्या चितेवर आत्मदहन करून एखादा तरी सता झाला आहे काय? असा प्रश्न करून या वाईट प्रथेतून स्त्रियांची मुक्ती झाले पाहिजे यासाठी फुले दाम्पत्याने प्रयत्न केले

## स्त्रीसबलीकरणासाठी सर्वंकष शिक्षणाचा प्रचार प्रसार :

अज्ञान म्हणजे अंधार अज्ञान म्हणजे हा प्रकाश अज्ञान अंधकार नष्ट करून मनुष्य के जीवन चैतन्य व आनंदमय करून सोडतो जीवनाचा संपूर्ण कायापालट करण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे शिक्षण सामाजिक क्रांतीचे एक प्रमुख साधन आहे त्यामुळेच ज्योतिराव फुलेंनी समाजक्रांतीचे पहिले शास्त्र म्हणून स्त्री शिक्षण हाती घेतले, कारण त्यावेळी श्रेणी शिक्षण घेणे हे त्यांना भ्रष्टाचार व महापाप करण्या सारखे वाटत. सना खाण्याच्या सडलेल्या मतावर तीव्र आघात करून महाराष्ट्रात प्रथम जोतीराव फुले यांनी स्त्री शाळेचा दरवाजा उघडून दिला कारण त्यांना माहित होते कि 'स्त्री शिक्षण म्हणजे पर्यायाने तिच्या मुलाचे शिक्षण होय.' जर आपण एखाद्या पुरुषाला शिक्षण दिले तर ते एका व्यक्तीला दिल्यासारखे आहे परंतु एखाद्या स्त्रीला शिक्षण दिले तर ते सर्व कुटुंबाला दिल्यासारखे आहे हे ओळखूनच ज्योतिराव फुले यांनी स्वातंत्र्यासाठी स्त्री शिक्षणासाठी प्रथम

टाहो फोडला.'न स्त्रि स्वातंत्र् महती' या परंपरागत पुन्हा वाचनाच्या सिनेमाबद्दल प्रथम जोतिरावांनी तोडले म्हणून जोतीरावांनी मनुस्मृतीला आव्हान देऊन अशी घोषणा केली," आता तरी तुम्ही मागे घेऊ नका! धिक्का:रूनी टाका मनू माता !!

विद्या शिकता पावल ते सुख! घ्यावा माझा लेख जोती म्हणे !!

यातूनच जोतीराव फुले यांनी इसवीस 1848 मध्ये मुलींसाठी शाळा सुरू केली शाळा सुरू केली खरी पण शाळेत शिकवण्यासाठी शिक्षक किंवा शिक्षिका मिळेना त्यावेळेस जोतीरावांनी आपल्या पत्नीस सावित्रीबाई यांना पहिल्यांदा साक्षर केले व त्यांच्यावर शिक्षकाचे काम सोपविले असे म्हणतात की भारतात इसवीसणाच्या प्रारंभापासूनच स्त्रीशिक्षण जवळजवळ दिसेनासे झाले होते सावित्रीबाईंचा शिक्षण क्षेत्रात प्रवेश झाल्यापासून हिंदू स्त्री सार्वजनिक क्षेत्रात पुन्हा उतरली असेच या ठिकाणी म्हणावे लागेल. महात्मा ज्योतिराव फुले सावित्रीबाई फुले समाजसुधारकांनी स्त्रीयांना जास्तीत जास्त शिकविण्यावर भर दिला. त्यासाठी विविध ठिकाणी शाळांची निर्मिती केली आणि सत्रीला सक्षम बनविण्याचे काम केले

## फुले दांपत्याचे क्रांतिकारक विचार आणि स्त्री सबलीकरण

स्त्रियांना हक्काची व कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी, नवा समाज स्थापन करण्यासाठी, मानवी समानतेचा पुरस्कार करून जातीभेद आणि स्त्री दास्यत्व संपुष्टात आणण्यासाठी सर्व समाजाला शिक्षणाची फार मोठी आवश्यकता आहे हे आवर्जून ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सांगितले. फुले दाम्पत्याने आपल्या पुरोगामी विचाराने परिपूर्ण असलेल्या धारदार लेखनाच्या आधारे साहित्यसेवा केली आहे या साहित्यातून विविध विषय हाताळले तसेच तेवढ्यात प्रखरतेने स्त्री सबलीकरणाचे विचार पुढे आणण्याचे काम या दाम्पत्याने केले. हजारो वर्ष ज्ञानाचे डोळे नसल्यामुळे स्त्रियांना आपल्या उद्धाराचा मार्ग दिसत नव्हता असा विचार व्यक्त करत असताना सावित्रीबाई फुले प्रभावीपणे मा

विषम रचीती समाजाची रिती, धूर्तांची ही नीती अमानव
विद्येविना गेले, वाया गेले पशु, स्वस्थ बसू नका विद्या घेणे!!

सावित्रीबाई फुले समाजातील विषम स्थिती बदलण्यासाठी समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीला धक्का देण्यासाठी त्या असे म्हणतात की," वाचे जे उच्चारी तशी क्रिया करी, तीच नरनारी पूजनीय

मानवाचे नाते ओळखती जे जे, सावित्री वदते तेच संत !!

## स्त्रियांच्या सबलीकरणात फुले दाम्पत्याच्या कार्याचे महत्व:

एकविसाव्या शतकातील स्त्री अबला नसून सबला झाले आहे असं म्हटलं जातं परंतु आज ही असे वास्तव आहे की स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. एकोणिसाव्या शतकात प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात जाऊन स्त्रियांच्या हिनतेची कारणे शोधून त्यांच्यामध्ये आत्मसन्मान निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला स्त्रियांना सुधारणा शिक्षणापासून वंचित ठेवणाऱ्या दांभिक उच्चवर्णीयांच्या विरोधात फुले दाम्पत्याने क्रांती चा झेंडा फडकावून उभारले या शैक्षणिक उठावाने अस्पृश्य

दलित आणि स्त्रियांच्या मनात आत्मविश्वास निर्माण केला जो आजपर्यंत टिकून आहे निर्भयता आणि स्वाभिमानाच्या भावनेने त्यांच्यातील माणूस जागा केला पशुत्वकडून मनुष्यत्वाकडे जाण्याची वाट या दाम्पत्याने दाखवून दिली. प्रस्थापित सनातन्यांच्या विरोधाला न जुमानता स्त्रियांच्या संदर्भात ज्या ज्या काय वाईट चालीरीती प्रथा परंपरा होत्या त्याचे उच्चाटन करण्याचे काम केले आज स्त्री विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करताना दिसून येत आहे स्त्रियांच्या यशाचे गमक हे फुले दांपत्याच्या कार्यातून दिसून येते प्रसंगी घरदार ही त्यांना सोडावे लागले स्वतःच्या घरी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली आणि अनेक स्त्रियांचे जीव वाचवण्याचे काम या दाम्पत्याने केले. स्त्रियांना शिक्षण देऊन अनेक स्त्रियांना पुढे आणण्याचे काम फुले दाम्पत्याने केले. फुले दाम्पत्याने घेतलेला शिक्षणाचा वसा फुले दांपत्याचे शैक्षणिक कार्याची तळमळ पाहून न्यायमूर्ती ब्राऊन यांनी त्या काळात गौरवोद्गार काढले सावित्रीबाई च्या शाळेतील मुलींचे प्रगती पाहून दादोबा तरखडकर यांनी समाधान व्यक्त केले तत्कालीन शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जॉन वार्डन यांनी त्यांच्या कार्याची स्तुती केली सावित्रीबाईंच्या शाळेतील 14 वर्षाच्या एका मातंग मुलींना लिहिलेला निबंध वाचून तत्कालीन परिस्थितीमध्ये अस्पृश्यांची स्थिती किती भयानक होते हे दिसून येते हा निबंध वाचल्यानंतर सावित्रीबाईंनी विद्यार्थ्यांत निर्माण केलेल्या नीतिधैर्य याची साक्ष पटते.

## निष्कर्ष:

स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि निखळ मानवता या चिरंतन मानवी मुल्याचा उद्घोष हाच फुले दांपत्याच्या क्रांतिकारी विचारांचा आणि कार्याचा गाभा आहे. गेल्या शंभर दीडशे वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर ही फुले दांपत्याच्या कार्याची उजळणी करणे का क्रमप्राप्त ठरते? त्यांच्या विचारांना आजच्या संदर्भात काही महत्त्वाचे स्थान आहे का? या प्रश्नाच्या संदर्भात फुले दांपत्याच्या विचाराचे कार्याचे स्मरण झाल्याशिवाय आजच्या काळातला त्यांचा संदर्भ आपल्या लक्षात येणार नाही. फुले दांपत्यांनी स्त्रियांच्या दुय्यम स्थान, स्त्री-पुरुष भेद, विधवा पुनर्विवाह, विधवांचे केशवपन, बालविवाह, या सारख्या अनिष्ट समस्या जन्म माणसाच्या लक्षात आणून दिला आणि त्यावर संघटित होऊन चळवळीच्या रूपाने वज्रप्रहार केला म्हणूनच त्याचे कार्य आधुनिक आधुनिक स्त्रीच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. काढून श्री शिक्षणावर भर देणाऱ्या फुले दांपत्याच्या विचाराची गरज आज हे आहे वंशाला दिवा असला पाहिजे म्हणून मुलासाठी नवाब साहेब बोलणारे माता पिता मुलगी या जगात जन्माला येऊ नये यासाठी तिच्या जन्माआधीच व्यवस्था करून ठेवतात, हुंड्याची प्रथा आजही कायम आहे घटस्फोटीत महिलांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते त्यांना आधार देण्यासाठी सर्वतोपरी फुले दांपत्याच्या विचाराची आणि कार्याची आवश्यकता आज ही आहे.

## संदर्भ:


1. घोरपडे ए.के. महात्मा फुले (चरित्र व कार्य)
2. मालशे स. श. व कीर धनंजय, महात्मा फुले समग्र ग्रंथ
3. अधिकारी प्रकाशन पुणे, ज्योतिराव समग्र ग्रंथ, प्रथमावृत्ती1963
4. Mukharji S.N. Education in India, today and tomarrow, Acharya book Depot Bandra 1952
5. हरी नरके (संपादक) , महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा, महाराष्ट्र शासन मुंबई.
6. धनंजय कीर, महात्मा ज्योतिराव फुले (चरित्र), पॉप्युलर प्रकाशन.
7. शांता रानडे, सावित्रीबाई फुले जीवन व कार्य, लोकवांगमय गृह प्रकाशन.

8. प्रेमा गोरे, थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले, विद्या प्रकाशन पुणे.
9. डॉ. म.गो. माळी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले
10. ग.बा. सरदार, महात्मा फुले, ग्रंथाली प्रकाशन,1981.
11. य.दी. फडके (संपादक), महात्मा फुले समग्र वाङमय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ.